# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com
**आयएसओ ९००१-२००८ मान्यता प्राप्त**


फॅक्स द्वारे

जा.क्र. विकाऔ/शिक्षण/२०१०/ ४३९५
दिनाक:- 30 JUN 2010

प्रति,
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन ~~औरंगाबाद~~/नांदेड/हिंगोली/जिंतूर/जालना/अंबड/उस्मानाबाद/बीड
पु.ला.शातंनि लातूर/शास.निवासी महिला तंत्रनिकेतन लातूर.

विषय : थेट व्दितीयवर्ष पदविका अभियांत्रिकी (तंत्रनिकेतन) प्रवेश प्रक्रिया २०१०-११.

उपरोक्त प्रकरणी कळविण्यात येते की,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून प्रथमवर्षाचा निकाल १/७/२०१० पर्यंत लागण्याची शक्यता आहे. निकालानंतर थेट व्दितीय वर्ष अभि.प्रवेशाची प्रक्रिया सुरु करावयाची असुन निकालानंतर तीन दिवसापर्यंत संस्था अंतर्गत अभ्यासक्रम बदलाबाबतची प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी.संस्था अंतर्गत अभ्यासक्रम बदलासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे पत्र क्रं.२९४२ दि.१९ जुन ०६ नुसार कार्यवाही करावी. निकाला नंतर सात दिवसापर्यंत संस्था बदल प्रकरणी प्रथमवर्ष प्रवेश माहिती पुस्तिका २०१०-११ मधील पान क्रं. ३५,३६,३७ वरील नियम २२.० आणि २३.० नुसार कार्यवाही करण्यात यावी.

निकालानंतर अभ्यासक्रम बदल आणि संस्था बदल प्रक्रिया पार पाडल्यानंतर साधारणतः आठ दिवसांनी संस्थेत असलेली थेट व्दितीय वर्ष प्रवेशासाठीची रिक्त जागांची माहिती या कार्यालयास ई-मेल/फॅक्स व्दारे सादर करावी.तसेच ही माहिती निकालानंतर साधारणतः आठव्या दिवशी संस्थेच्या मुख्य सुचना फलकावर व आवश्यक ठिकाणी विदयार्थी व पालकांना अवगत होईल या रितीने प्रसिध्दिस दयावी. अशी माहिती संस्थेच्या वेबसाईटवरही प्रसिध्द करावी. दरम्यानच्या कालावधीत प्रवेश अर्ज विक्री व अर्ज भरण्याची प्रक्रिया सोबत दिलेल्या वेळापत्रकानुसार सुरु करावी व रिक्त जागांनुसार थेट व्दितीय वर्ष प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ करण्यात यावा.

शासन निर्णय क्रं.जीटीबी-१००५/(१८६/०९)तांशि-५ नुसार थेट व्दितीय वर्ष प्रवेशासाठी अभ्यासक्रमांच्या मुळ प्रवेश क्षमतेच्या १०% जागावर प्रवेशासाठी **दोन जागा आयटिआय उत्तीर्ण विदयार्थ्यासाठी,दोन जागा बारावी एमसीव्हिसी विषयासह उत्तीर्ण विदयार्थ्यासाठी आणि उर्वरित जागा बारावी तांत्रिक अभ्यासक्रम उत्तीर्ण विदयार्थ्यासाठी असतील.** हे प्रमाण साठ प्रवेश क्षमतेसाठी असुन अधिक प्रवेश क्षमतेसाठी त्यानुसार बदल करण्यात यावेत. प्रथमवर्षात अनुत्तीर्ण झाल्यामुळे होणा-या रिक्त जागांसाठी प्रथम प्राधान्य हे बारावी तांत्रिक विषय घेऊन उत्तीर्ण विदयार्थ्यांना देण्यात यावा त्यानंतर आयटिआय व त्यानंतर बारावी एमसीव्हिसी विदयार्थ्यांना प्राधान्यक्रम देण्यात यावा.

थेट व्दितीय वर्षासाठी प्रवेश पात्रता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने निर्धारित केलेली असुन मंडळाच्या वेबसाईटवर या बाबतची सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.या बाबत मंडळाचे पत्र क्रं २७४९ दिनांक ८/६/२०१० आणि २७६८ दिनांक ९/६/२०१० च्या पत्रानुसार पात्रतेच्या निकषाच्या अधीन राहून तसेच प्रथमवर्ष प्रवेश माहितीपुस्तिका २०१०-११ मधील पान क्रं. ३५,३६,३७ वरील नियम क्रं. २२.० आणि २३.० नुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी. प्रवेशाबाबतची अधिसूचना या कार्यालयामार्फत वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येत असुन प्रवेश अर्जाचा नमुना या कार्यालयाच्या वेबसाईटवरुन प्रसिध्द करण्यात येईल व आपल्या ई-मेलवर पाठविण्यात येईल. सदर प्रवेश अधिसूचित केलेल्या तारखांना एकाच फेरीत पुर्ण करावेत. या फेरीनंतर शिल्लक राहिलेल्या जागांचा तपशिल संस्थास्तरावर प्रसिध्द करुन सर्व प्रवेश मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई हे प्रवेशाची अंतिम तारीख जाहिर करतील तत्पुर्वी करण्यात यावेत.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद.

30/6/2010

# थेट व्दितीयवर्ष पदविका अभियांत्रिकी (तंत्रनिकेतन) प्रवेश प्रक्रिया २०१०-११.

| अ.क्रं. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| ०१ | थेट व्दितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया प्रवेश अर्ज विक्री आणि भरलेले अर्ज स्विकारणे | दि.२/७/१० ते ११/७/२०१० संध्याकाळी ०५ पर्यंत |
| ०२ | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्दि | दि.१२/७/२०१० दु.१२.०० वा. |
| ०३ | तात्पुरती गुणवत्ता यादी वर आक्षेप नोंदणी | दि.१३/७/२०१० दु.०३.०० पर्यंत |
| ०४ | अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्दि | दि.१४/७/२०१० सकाळी ११-०० वाजता |
| ०५ | थेट व्दितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया | दि.१५/७/२०१० शास.तंत्रनिकेतन जालना |
| | | दि.१५/७/२०१० शास.तंत्रनिकेतन नांदेड |
| | | दि.१५/७/२०१० पु.ला.शास.तंत्रनिकेतन लातूर. |
| | | दि.१६/७/२०१० शास.तंत्रनिकेतन अंबड |
| | | दि.१६/७/२०१० शास.निवासी महिला तंत्रनिकेतन लातूर |
| | | दि.१६/७/२०१० शास.तंत्रनिकेतन हिंगोली |
| | | दि.१७/७/२०१० शास.तंत्रनिकेतन जिंतूर |
| | | दि.१७/७/२०१० शास.तंत्रनिकेतन उस्मानाबाद |
| | | दि.१७/७/२०१० शास.तंत्रनिकेतन बीड |

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद.

30/6/10 30/6/2010